# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २५७-२२** **दिनांक १७/०८/२०२२**

**मोबाईलचे दुकान फोडुन चोरी करणाऱ्या आरोपींकडून ३० मोबाईल फोन व रोख रक्कम हस्तगत करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेस यश .**

---

दिनांक २५/०७/२०२२ रोजी रात्री १०:०० वा ते दिनांक २६/०७/२०२२ रोजी सकाळी १०:०० वा. चे दरम्यान गाळा नं : ०२, प्रथमेश अपार्टमेंट, संतोष भुवन तलावा जवळ, नालासोपारा पुर्व, येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने एस. के. मोबाईल स्टोर दुकानाचे छतास असलेल्या सिमेंटचा पत्रा व सिलींग फोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन ९४,०००/-रुपये किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे मोबाईल, ब्ल्युटूथ, पॉवर बँक, तसेच ५,०००/- रूपये रोख रक्कम अशी मालमत्ता चोरी करुन नेले होते. सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.क्र. I ६३६/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून समांतर तपास करीत असताना तांत्रिक विश्लेषणाने आरोपीची माहिती प्राप्त करून हनुमान मंदिर जवळ अलकापूरी नालासोपारा पुर्व येथे तपास पथकाने सापळा रचुन इसम नामे निकेश जनार्दन गमरे, वय. २८ वर्ष, रा. रूम नं. ४०३, विंग-सी, आयेशा अपार्टमेंट,हनुमान मंदिर जवळ, अलकापूरी, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि. पालघर यास ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून वेगवेगळया कंपनीचे ३० मोबाईल व ५,०००/- रुपये रोख रक्कम असा एकूण ५४,९९४/- रूपये किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. तसा सविस्तर पंचनामा केला असुन सदरचे मोबाईल फोन हे वर नमुद गुन्हयातील चोरीस गेलेले असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास त्याबाबत अधिक विचारपुस केली असता, सदरची घरफोडी चोरी त्याने आणखी २ साथीदारांसह केल्याचे निष्पण झाले आहे. अशा प्रकारे घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश प्राप्त झाले आहे. नमुद आरोपीस १२/८/२०२२ रोजी ताब्यात घेण्यात आले असून पुढील कार्यवाही करीता पेल्हार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पेल्हार पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अति. कार्य. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री राहुल राख, स.पो.नि. अमोल आंबवणे, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा. शिवा पाटील, गोविंद केन्द्रे, पो.ना. संग्राम गायकवाड, राजाराम काळे, पो.अं.महेश वेल्हे, सतीश जगताप, सुशील पवार, मसुब. सचिन चौधरी यांनी केलेली आहे.



------ oooo ------